The Founder



The late Shahir
M. N. Nanivadekar
(1904 - 1962)

# NANIVADEKAR SHAHIRI SANGAM

## नानिवडेकर शाहिरी संगम

Reg. No. 374/1975-GBBSD (Maharashtra State)
Public Trust Reg. No. F./10475 (1985) (Maharashtra State)

1/18, Goregaonkar Buildings, Near Central Cinema, Girgaum, Bombay 400004
१/१८, गोरेगांवकर बिल्डींग, सेंट्रल सिनेमाजवळ, गिरगांव मुंबई ४०० ००४.

Shaheer Adnyandas Smruti, Badlapur Gaon Rd., Kulgaon 421 503 Dist. Thane ☎ 0251-590687
शाहीर अज्ञानदास स्मृति, बदलापूरगांव रस्ता, मु. पो. कुळगांव ४२१५०३ जि. ठाणे ☎ ०२५१-५९०६८७

॥श्री:॥

### दीक्षितकुलभूषणा

दीक्षितकुलभूषणा गणेशा दत्तात्रेयसुता — हेऽ दत्तात्रयसुता
धालें मन तुज कृतज्ञतेनें श्रद्धांजलि वाहतां ॥१॥
कर्पुरगंगा-तिरीं चिंचणी तासगांव-तालुका।
पुरी चांगली सांगली तिच्या वाढविसी लौकिका ॥२॥
दत्तभक्तिचें बाळकडू तुज रोमारोमांतुनी।
धुंडिराज वर्षत्तां कृपा-घन, धन्य होसि तूं मनीं ॥३॥
दत्तभक्तिनें राष्ट्रभक्तिचें रूप जणूं घेतलें।
त्या रूपानें भारून गेलें भावुक तव मन भलें ॥४॥
तोडाया मातृभू-पदींच्या पारतंत्र्य-शृंखला।
धुरेश्वराजीं चंग बांधुनी समरशंख फुंकला ॥५॥
नेत्यांची ती निर्वाणीची हांक तदा परिसुन।
धुमविलास तडफेनें डफ तूं, तुणतुणेंहि चढवुन ॥६॥
खडा पवाडा, सूर खडा तव, तूंहि मंचकीं खडा।
रसिक-मनीं तव अजुनि स्मृतींचा दरवळतो केवडा ॥७॥
जनजागृतिचा ताप दीक्षिती गोऱ्यांना बाधला।
फोडुन ध्वनिमुद्रिका शाहिरी; राग तयें काढला ॥८॥
गोऱ्यांची ही काळी करणी तुम्हां न भिववुं शके।
गज चाले निज डौलें जारे तैं भुंकत कुत्रें सुखें ॥९॥
केलासी संचार चहुंकडे भारून जन टाकले।
कितिकांसी मिळुनिया स्फूर्ति ते उभे रणा ठाकले ॥१०॥
'दरबारी शाहिर' म्हणुनिया नांव तुझें गाजलें।
जनीं 'क्रान्तिशाहिर' बिरुदानें तुजला नावाजलें ॥११॥
उणें पुरें चाळिस वर्षांचें आयु लाभलें तुला।
परी तुझ्या शाहिरी कलेच्या खूप बहरला मळा ॥१२॥
चिरंजीव झालास कृतीनें तव नांवाची ध्वजा।
खांद्यावर मिरविती शिष्य तव गाती गौरव तुझा ॥१३॥
तव नामांकित स्मृतिचिन्हानें पुलकित तनु जाहली।
हे रघुनाथाग्रजा कृपेची सदा करी सावली ॥१४॥

दिनांक: २६ जुलै १९९५. —— शाहिर वसन्तराय नानिवडेकर, मुंबई
(व. रा. नानिवडेकर)